
# इतिहास

## इयत्ता बारावी















# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.01.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

J9Z4H6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित असलेले अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : नोव्हेंबर २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
डॉ. शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ. प्रिया गोहाड, सदस्य
डॉ. नलिनी वाघमारे, सदस्य
डॉ. प्रशांत देशमुख, सदस्य
प्रा. शामा कुलकर्णी, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**लेखक**

डॉ.गणेश राऊत

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री. देवदत्त बलकवडे
**नकाशाकार** : श्री. रवीकिरण जाधव
**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2020-21/Qty.- 80,000
**मुद्रक** : M/s. Shah Trading Corporation, Nagpur

**इतिहास अभ्यासगट समिती**

डॉ. शिवानी लिमये
श्री. वैजनाथ काळे
डॉ. धनंजय चौधरी
प्रा. श्रीधर घुंडरे
श्री. समीर मानकर
डॉ. धनाजी मासाळ
श्री. कृष्णा देशमुख
डॉ. सिद्धार्थ जाधव
प्रा. अनुरथ काळे
डॉ. मुशीर शेख
श्री. संदीप डोईफोडे
श्री. बाळासाहेब चावरे
डॉ. सचिन डेंगळे
श्रीमती. शिवकन्या कदेरकर
डॉ. डी.पी.खराडे
डॉ. रावसाहेब शेळके
श्री. मोहन शेटे
प्रा. अश्विनी बेडगे
प्रा. सुषमा नानगुडे

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**निमंत्रित**

श्री. मोगल जाधव

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इतिहास हा विषय भूतकाळ आणि वर्तमानकाळ समजून घेण्यासाठी मदत करतो. त्याच्या आधारे आपणास भविष्यकाळ घडवता येतो. हा भविष्यकाळ उज्ज्वल घडवण्यासाठी इतिहासाचे आकलन योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. अशा आकलनासाठी इतिहासाचे हे पाठ्यपुस्तक उपयुक्त आहे.

इयत्ता बारावीच्या पाठ्यपुस्तकात आपणास युरोप, अमेरिका, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया या खंडांचा ओझरता इतिहास ज्ञात करून देण्यात आला आहे. युरोपातील प्रबोधन, वसाहतवाद, वसाहतवादाविरुद्ध भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात उभारला गेलेला लढा, निर्वसाहतीकरणाची चळवळ, शीतयुद्ध आणि बदलता भारत यांचा अंतर्भाव या पाठ्यपुस्तकात केला आहे.

या पाठ्यपुस्तकात गेल्या जवळपास पाचशे वर्षांचा आढावा घेण्यात आला आहे. भूतकाळातील घटना ते समकालीन घटना असा व्यापक आढावा घेऊन जागतिकीकरणात भारताची वाटचाल कशी चालू आहे याचा मागोवा घेतला आहे. इयत्ता बारावीच्या पाठ्यपुस्तकात तसेच पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावर देण्यात येणाऱ्या Q.R.Code वर अध्यापनासाठी पूरक साहित्य उपलब्ध करून देत आहोत.

अकरावी आणि बारावीची दोन्ही पाठ्यपुस्तके आपणास प्राचीन ते अर्वाचीन कालखंडाची ओळख करून देतात. इतिहास विषयाच्या सखोल अभ्यासासाठी तसेच स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना ही पाठ्यपुस्तके उपयुक्त आहेत. इतिहास विषयाचा आशय समजून घेण्यास आणि विषयाची व्यापकता समजून घेण्यासाठी ही पाठ्यपुस्तके उपयोगी आहेत.

इतिहास विषय समिती, इतिहास अभ्यासगट समिती, लेखक, चित्रकार यांनी या पाठ्यपुस्तकाचा आशय लक्षात घेऊन पुस्तक अधिकाधिक उत्तम होण्याच्या दृष्टीने परिश्रम घेतले आहेत. पाठ्यपुस्तकातील आशय समजून घेण्यासाठी वेबसाईटस् दिल्या आहेत. त्यांचा अध्ययनासाठी निश्चितच उपयोग होईल.

वाचक, पालक, विद्यार्थी आणि अभ्यासक यांच्याकडून सदर पाठ्यपुस्तकासंदर्भात काही सूचना आणि शिफारशींचे स्वागतच आहे. आम्ही अशी आशा करतो की, समाजातील सर्वच घटकांकडून या पाठ्यपुस्तकाचे स्वागत होईल.

**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीच्या अभ्यासक्रमात आपण प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास अभ्यासला. या पाठ्यपुस्तकात मध्ययुगीन जग, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक जग असा पाचशे वर्षांचा विशाल पट आपण अभ्यासणार आहोत. युरोपातील प्रबोधन, भारतातीलच नव्हे तर जगभरातील वसाहतवाद आणि त्याला झालेला प्रतिकार, महायुद्‌धोत्तर जग आणि बदलता भारत या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जग कसे बदलते याचे भान निर्माण करता येईल.

युरोपातील प्रबोधनाचा काळ आणि विज्ञानाचा विकास यातून औद्योगिक क्रांती आकारात आली. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवाद वाढला आणि वसाहतवादामुळे औद्योगिक क्रांतीस अधिकच चालना मिळाली. यातून साम्राज्यवाद वाढला आणि जगभरात वसाहतवादाची प्रक्रिया वाढीस लागली. याचे भान आपण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणार आहोत.

'वसाहतवाद आणि महाराष्ट्र' हा पाठ स्थानिक इतिहासातला महत्त्व देणारा आहे. या पाठाच्या माध्यमातून महाराष्ट्राने युरोपीय सत्तांना केलेला विरोध आपण समजून घेणार आहोत. भारतात आलेल्या सर्वच युरोपीय वसाहतवाद्यांशी मराठी सत्तेने संघर्ष केला. प्रसंगी त्यांचा पराभव सुद्‌धा केला. हा रोमहर्षक लढा तत्कालीन मोडी कागदपत्रे, उत्तरकालीन कागदपत्रे वा बखरींमध्ये नोंदवला आहे. इंग्रज व्यापाऱ्यांच्या संदर्भातील छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. या आज्ञापत्रातून महाराजांचे द्रष्टेपण दिसून येते. या संघर्षाच्या पलीकडचे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे दूरदर्शित्व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देणे महत्त्वाचे आहे. त्याद्‌वारे वसाहतवाद्यांशी स्थानिक लोकांनी दिलेला लढा अभ्यासण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

भारतातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा लढा या अभ्यासक्रमातील एक महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा लढा देण्याची गरज या समाजात का निर्माण व्हावी असे विचारमंथन या निमित्ताने घडून नेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या मनात 'का' असा प्रश्न निर्माण होणे गरजेचे आहे. या पाठाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांचे निवासस्थान, प्रार्थना समाजाचे मंदिर इत्यादी ऐतिहासिक वारसा असणाऱ्या वास्तूंचे दर्शन घडवता येईल. इतिहास जेथे घडला तेथे जाऊन इतिहास अनुभवता येईल.

वसाहतवादाविरुद्‌धचा लढा भारतात १८१७ पासून ते १९४७ पर्यंत चालू होता. फ्रेंच आणि पोर्तुगीज यांच्या विरोधात भारताला १९६० पर्यंत लढा द्यावा लागला. या भागाचे अध्यापन करताना १८५७ चा स्वातंत्र्यलढा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना आणि टिळक व गांधी युगांची वैशिष्ट्ये, सशस्त्र लढा, स्वातंत्र्यप्राप्ती, संस्थानांचे विलीनीकरण, फ्रेंच आणि पोर्तुगीज वसाहतींची मुक्तता यांची माहिती विद्यार्थ्यांना अस्सल समकालीन साधनांच्या आधारे देता येईल. समकालीन राष्ट्रीय आणि स्थानिक वृत्तपत्रे, माहितीपट, अनुबोधपट, ध्वनीफिती यांच्या आधारे विशेषतः इंटरनेटरवरील साहित्य यांच्या सहभागाने अध्ययन-अध्यापन अधिक रंजक आणि उपयुक्त करता येईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात विसाव्या शतकात घडून आलेले निर्वसाहतीकरण आणि त्याला कारणीभूत ठरलेली महायुद्‌धांची पार्श्वभूमी यांचे अध्यापन समकालीन चित्रपट, वृत्तपत्रे, चरित्रे, आत्मचरित्रे ही दुय्यम साधने तसेच अधिकृत कागदपत्रे ही प्राथमिक साधने यांच्या आधारे करता येईल. विसाव्या शतकात जागतिक राजकारणात असणारे भारताचे स्थान या पद्‌धतींनी समजून घेता येईल. शीतयुद्‌धाचा उदय आणि विस्तार व शेवट हा भाग नव्या जागतिक राजकारणाची सुरुवात करणारा कसा आहे हे विद्यार्थ्यांना समजावून दिल्यास २१ व्या शतकाचे आकलन होणे सोपे होईल.

जागतिकीकरणानंतरचा भारत या भागात विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा प्रत्यक्ष अभ्यास करता येणार आहे. दैनंदिन जीवनावर परिणाम घडवून आणणारी राज्य वा राष्ट्रीय स्तरावरील घटना आपल्या आयुष्यात कशी महत्त्वाची आहे याची जाणीव 'बदलता भारत' या पाठांमधून करून देता येईल.

पाठ्यपुस्तकातील आशयाच्या आधारे चर्चा, गटचर्चा, प्रकल्प, भित्तीपत्रके एकाच विषयाच्या आधारे अनेक ऐतिहासिक पैलू समजून घेता येतील, असे उपक्रम राबवता येतील. पाठ्यपुस्तकातील रचना करताना ज्ञानरचनावादी शिक्षण आणि कृतियुक्त अध्यापन यांना विशेष महत्त्व दिले आहे. पाठांमध्ये रंजक व विचारप्रवृत्त करणाऱ्या चौकटी दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचा सहभाग अधिकाधिक वाढावा याची काळजी घेतलेली आहे. 'माहिती, विचार आणि कृती' या त्रिसूत्रीच्या आधारे प्रत्येक पाठाची रचना करून विद्यार्थ्याला स्वमत प्रकटीकरणासाठी वाव दिला आहे. पूरक माहिती क्यूआर कोड आणि वेबसाइटच्या माध्यमातून दिली आहे. तिचाही अध्ययन-अध्यापन करताना उपयोग करणे अपेक्षित आहे.

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | युरोपातील घडामोडींचा भारतावरील परिणाम | - 'धर्मयुद्धे' म्हणजे काय हे सांगता येणे.<br>- 'धर्मयुद्धे' सुरू होण्याची पार्श्वभूमी सांगता येणे.<br>- युरोपातील प्रबोधन या संकल्पनेचे आकलन होणे आणि त्या संदर्भात ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रांतील प्रगतीची चर्चा करणे.<br>- भौगोलिक शोधांमुळे नवीन सागरी मार्गाचा शोध लागला याची मांडणी करणे.<br>- भारताकडे येणाऱ्या सागरी मार्गाचे विवेचन करणे.<br>- जगावर झालेला औद्योगिक क्रांतीचा परिणाम याची चिकित्सा करणे. |
| २. | वसाहतीकरणाची प्रक्रिया | - 'वसाहतवाद' या संकल्पनेचा अर्थ सांगता येणे.<br>- अमेरिका खंडात झालेल्या युरोपीय वसाहती आणि अमेरिकेची स्वातंत्र्यप्राप्ती याची माहिती घेणे.<br>- युरोपीय वसाहतवादाच्या प्रसारामुळे आशिया आणि आफ्रिका खंडांमधील प्रदेशांवर काय परिणाम झाला याची चिकित्सा करणे.<br>- वसाहतीकरणाचे भारतावर काय परिणाम झाले याचे विश्लेषण करणे. |
| ३. | भारताचे वसाहतीकरण | - भारतामध्ये पोर्तुगिजांचे झालेले आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश यासंबंधीची माहिती घेणे.<br>- भारतामध्ये झालेले डचांचे आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश यासंबंधीची माहिती घेणे.<br>- भारतात झालेले इंग्रज व फ्रेंचांचे आगमन आणि त्यांच्या वर्चस्वाची माहिती घेणे. |
| ४. | युरोपीय वसाहतवादाला महाराष्ट्रात झालेला विरोध | - युरोपीय वसाहतवादाला महाराष्ट्र कसा सामोरा गेला याची चिकित्सा करणे.<br>- पोर्तुगिजांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अंगिकारलेले धोरण स्पष्ट करणे.<br>- इंग्रज आणि मराठे यांच्यातील राजनैतिक संबंध समजून घेणे.<br>- छत्रपती शिवाजी महाराजांची निर्णयक्षमता व धैर्य यांचे अभ्यासपूर्ण विवेचन करणे.<br>- छत्रपती संभाजी महाराजांनी युरोपीय वसाहतवादाला विरोध केला याची माहिती घेणे. |
| ५. | वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष | - भारतात १८५७ पूर्वी इंग्रजांविरुद्ध झालेल्या लढ्यांची समीक्षा करणे.<br>- १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा इंग्रजांच्या अन्यायी धोरणांविरुद्ध भारतीयांनी केलेला संघर्ष होता हे समजून घेणे.<br>- भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना होण्यामागील कारणमीमांसा करणे.<br>- स्वातंत्र्यलढ्यातील भारतीय नेत्यांच्या योगदानाची माहिती घेणे. |
| ६. | निर्वसाहतीकरण ते एकीकरण | - 'निर्वसाहतीकरण' या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करता येणे.<br>- निर्वसाहतीकरण ते एकीकरण ही वाटचाल समजून घेणे.<br>- गोवा, दीव, दमण, पुदुच्चेरी या वसाहतींच्या मुक्तिलढ्याची चर्चा करणे.<br>- भारतीय स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती नकाशाच्या साहाय्याने स्पष्ट करणे. |
| ७. | भारताबाहेरील प्रदेशांचे निर्वसाहतीकरण | - आशिया खंडात कोणत्या प्रदेशांमध्ये युरोपीय वसाहती होत्या याची सूची तयार करता येणे.<br>- आफ्रिकेतील कोणत्या प्रदेशांमध्ये युरोपीय वसाहती होत्या हे सांगता येणे.<br>- निर्वसाहतीकरणाच्या संदर्भातील घटनांचे स्पष्टीकरण करता येणे. |
| ८. | जागतिक महायुद्धे आणि भारत | - पहिल्या महायुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- दुसऱ्या महायुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- जागतिक महायुद्धांच्या संदर्भात भारताच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.<br>- महायुद्धांच्या भारतावर झालेल्या परिणामांची कारणमीमांसा करणे. |
| ९. | शीतयुद्ध | - 'शीतयुद्ध' ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>- शीतयुद्धाची कारणमीमांसा करणे.<br>- नाटो, सिएटो, सेंटो, ॲन्झुस या करारांची माहिती घेणे.<br>- युरोप व आशिया खंडातील शीतयुद्धाच्या टप्प्यांविषयी चर्चा करणे.<br>- भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची चिकित्सा करणे. |
| १०. | बदलता भारत | - सन १९९० पासून भारताने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा चिकित्सक अभ्यास करणे.<br>- भारताने विविध क्षेत्रांत केलेल्या बदलांची माहिती घेणे.<br>- भारतामध्ये नव्याने निर्माण झालेल्या राज्यांची माहिती सांगता येणे.<br>- भारतातील वारसा जतन व जागृती करणाऱ्या INTACH या संस्थेची माहिती घेणे. |

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास ......... | १ |
| २. | युरोपीय वसाहतवाद ................................ | १० |
| ३. | भारत आणि युरोपीय वसाहतवाद..................... | १९ |
| ४. | वसाहतवाद आणि मराठे............................ | २४ |
| ५. | भारत : सामाजिक व धार्मिक सुधारणा................ | ३३ |
| ६. | वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष................ | ३९ |
| ७. | भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण................. | ५३ |
| ८. | जागतिक महायुद्धे आणि भारत...................... | ५८ |
| ९. | जग : निर्वसाहतीकरण .............................. | ६६ |
| १०. | शीतयुद्ध ........................................... | ७० |
| ११. | बदलता भारत– भाग १.............................. | ८० |
| १२. | बदलता भारत – भाग २ ............................. | ९० |



• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2020. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/ Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.